**मे. जी. आर. क्रिष्णा फेरो अलॉयज, प्रा. लि., प्लॉट नं. बी-४, एम.आय.डी.सी. मुल ग्रोथ सेंटर, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित २ DRI किल्नस् प्रत्येकी क्षमता ७०० टन/दिवस करीता स्पाँज आर्यन उत्पादन ४२०००० टन/वर्ष, स्टील मेल्टींग शॉप २६४००० टन/वर्ष प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १५/०३/२०२४ |
| वेळ | : | सकाळी ११:३० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, प्लॉट नं बी-४, एम.आय.डी.सी. मुल ग्रोथ सेंटर, नुल, ता. मुल, जि. चंद्रपूर. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. जी. आर. क्रिष्णा फेरो अलॉयज, प्रा. लि., प्लॉट नं. बी-४, एम.आय.डी.सी. मुल ग्रोथ सेंटर, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित २ DRI किल्नस् प्रत्येकी क्षमता ७०० टन/दिवस करीता स्पाँज आर्यन उत्पादन ४२०००० टन/वर्ष, स्टील मेल्टींग शॉप २६४००० टन/वर्ष या प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) ला दिनांक १८ मे, २०२३ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थिन केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. जी. आर. क्रिष्णा फेरो अलॉयज, प्रा. लि., प्लॉट नं. बी-४, एम.आय.डी.सी. मुल ग्रोथ सेंटर, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०४/१०/२०२३ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक १४/०२/२०२४ रोजी

जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१०. नगर पंचायत कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
११. नगर परिषद कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१२. गट-ग्रामपंचायत कार्यालय, चिखली (चिखली-१, चिखली-२, कन्हाळगाव चक, बेलाघाट-१, बेलाघाट-२), ता. मुल, जि. चंद्रपूर.
१३. गट-ग्रामपंचायत कार्यालय, मोरवाही मुल (मोरवाही मुल व मोरवाही चक) ता. मुल. जि. चंद्रपूर.
१४. गट-ग्रामपंचायत कार्यालय, टेकाडी (टेकाडी व सदागड) ता. मुल. जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, कोसंबी, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, मरेगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, राजगड, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१८. ग्राम पंचायत कार्यालय, चिमडा, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१९. ग्राम पंचायत कार्यालय, आकापूर, ता. मुल, जि. चंद्रपूर.
२०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २० वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या

पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-१२३/२०२४ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२४०२२६-एफटीएस-०००८ दिनांक २६/०२/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर= | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ८४ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्त:-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की

सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्प व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्त्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे आहेत:-</u>**

१) **<u>श्री. संदीप कारमवार, रा. आकापूर, ता. मूल, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाचे आम्ही स्वागत करतो. या प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील तापमानात व प्रदूषणात किती फरक पडणार आहे. सोबतच आमच्या परिसरातील बेरोजगारांना किती प्रमाणात रोजगार मिळणार याची माहिती देण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर प्रकल्पामुळे प्रदूषणात नगण्य प्रमाणात वाढ होणार आहे. कंपनी योग्य ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविणार व प्रदूषण होणार नाही याची काळज घेण्यात येईल.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल याची हमी देतो. |

२) **<u>श्री. मंगेश अशोक पोटवार, तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, टेकाडी, ता. मूल, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या MIDC मध्ये येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाचे आम्ही स्वागत करतो परंतु यासोबतच कंपनीकडून आमच्या काही अपेक्षा आहे. या अपेक्षासुद्धा कंपनीने पूर्ण केल्या पाहिजेत. मुल तालुक्यातील बेरोजगार युवकांना कंपनीने प्राधान्याने काम दिले पाहिजे. रोजगार देतेवेळी फक्त पुरूषांनाच नाही तर स्त्रीयांचा देखील विचार करावा ही कळकळीची विनंती आहे. तसेच कंपनीने प्रकल्पामध्ये योग्य ती प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसवून ती व्यवस्थितरीत्या चालवावी जेणेकरून स्थानिकांना प्रदूषणाचा त्रास होणार नाही. या परिसरातील अकुशल कामगारांसाठी कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार द्यावा ही विनंती आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कमीत कमी ८० टक्के स्थानिकांना प्रकल्पात रोजगार देण्यात येईल. याबाबत योग्य ती कारवाई करून स्त्रीयांना देखील रोजगारात समाविष्ट करण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल. अकुशल व्यक्तिंना कुशल करण्याकरिता कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येईल. |

३) **<u>श्री. व्यंकटेश पुल्लकवार, रा. मूल, ता. मूल, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर प्रदूषणात वाढ होईल. त्यामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच ८० टक्के रोजगार हा मूल तालुक्यतील | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कमीत कमी ८० टक्के स्थानिकांना प्रकल्पात रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | युवकांनाच द्यावा अशी आमची विनंती आहे. | |

४) **श्री. अंबादास विठ्ठल मांदाडे, रा. टेकाडी, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | MIDC मूल मध्ये सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे आमच्या गावातील शेतपिकांचे नूकसान झाले असून त्याकडे जिल्हा प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी प्रकल्पाची उभारणी केली जाते परंतु आतापर्यंतच्या कोणत्याही प्रकल्पात स्थानिकांना अपेक्षेप्रमाणे रोजगार मिळाला नाही. तरी माझी मा. अध्यक्ष साहेबांना विनंती आहे की स्थानिकांना रोजगार देण्यात यावा व शेतपिकांचे होणारे नूकसान टाळण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल याची हमी देतो. |

५) **श्री. प्रशांत गट्टुवार, मूल, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणीला उपस्थित सर्व नागरीकांची या प्रस्तावित प्रकल्पात रोजगाराची अपेक्षा आहे. कंपनीचा स्थानिकांना रोजगार देण्याची प्रयत्न काही काळ राहतो. हा प्रयत्न पूरेपूर टिकत नाही. कंपनी स्थानिकांना रोजी तत्त्वावर रोजगार देते व त्यांचेकडून 12 तास काम करविले जाते. सदर परिसरात कंपन्या यायला हव्या परंतु कंपन्यांनी गावकऱ्यांची देखील काळजी घेतली पाहिजे. CSR निधीचा परिसरातील गावांकरिता वापर होत नाही. परिसरातील प्रदूषणची पातळी पाहता येथे आरोग्य शिबीरे घेण्यात येत नाहीत. कंपन्यांच्या प्रदूषणामुळे स्थानिकांमध्ये श्वसनाचे आजार, किडनीचे आजार फार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्याकडे लक्ष देण्यात यावे. MIDC परिसरामध्ये चांगले रस्ते बांधले पाहिजे. सद्यःस्थितीत MIDC तील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. रस्त्यांवर पाणी फवारणी करण्यात यावी. रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे अपघात होतात व ग्रामीण रूग्णालयामध्ये पुरेसे अत्याधुनिक उपकरणे नसल्यामुळे अपघात झालेल्या व्यक्तिला त्याचा जीव गमवावा लागतो. त्याकरिता MIDC परिसरामध्ये सुसज्जित वैद्यकीय उपचार केंद्र सुरू व्हायला हवे. तसेच प्रत्येक महिन्यात आरोग्य शिबीर घेण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पात सर्व कामगार फक्त ८ तासच काम करतात. CSR अंतर्गत गावांच्या आवश्यकतेनूसार सुविधा पूरविण्यात येतील. भविष्यात आरोग्य शिबीरे देखील घेण्यात येतील. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |

६) **<u>श्री. राजेश बेले, संस्थापकीय अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकाने सादर केलेले पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश खोटा आहे. सदर अहवालामध्ये नमूद जल, वायु व ध्वनी गुणवत्ता तपासणी ही खोटी आहे. PM१० व PM२.५ चे प्रमाण यापेक्षा जास्त आहे. सदर तपासणी करतेवेळी गावाती लोकप्रतिनिधी किंवा ग्रामपंचायतीतील पदाधिकारी उपस्थित नव्हते. सद्य:स्थितीत कार्यरत असलेली जी.आर.क्रिष्णा या कंपनीद्वारे घातक वायु प्रदूषण करण्यात येते. माहे ऑगस्ट-२०२३ मध्ये सदर उद्योगाला प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांचेतर्फे कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वी सांगण्यात येते की प्रदूषण होणार नाही परंतु प्रदूषण होतेच. कंपन्यांना प्रदूषण नियंत्रण सयंत्रणांच्या देखभाल व दुरूस्तीकरिता मोठ्या प्रमाणात खर्च येतो. रात्रीच्या वेळी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बंद करून उद्योग चालविले जातात. सदर प्रकल्प प्रदूषणकारी असल्यामुळे माझी गावकऱ्यांना विनंती आहे की सदर प्रकल्पास परवानगी देण्यात येऊ नये. कंपनी कंत्राटी पद्धतीवर स्थानिकांना रोजगार देते. प्रत्यक्ष रोजगार देत नाही. कंपनीने प्रत्यक्ष स्वरूपाचा रोजगार द्यावा. कंपनीने पर्यावरण विषयक उपाययोजना करून उद्योग चालवावा व स्थानिकांना प्रत्यक्ष स्वरूपाचा रोजगार द्यावा. सदर प्रकल्पास संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्थेचा विरोध आहे. परिसरातील मे. जी.आर. क्रिष्णा उद्योगात हवा प्रदूषण नियंत्रण व्यवस्था नाही. परवानगी देऊ नये. नागरिक उपोषणावर होते. कायद्याप्रमाणे रोजगार द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, परिसरातील जल, वायु, मृदा व ध्वनी तपासणी ही राष्ट्रीय परिक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (NABL) प्रमाणीत संस्थेद्वारे करण्यात आली आहे. आपल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे व त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल. |

७) **<u>श्री. प्रशांत समर्थ, माजी बांधकाम सभापती, नगर परिषद मूल, ता. मूल, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जी.आर.कृष्णा फेरो अलॉय कंपनीला माझ्या शुभेच्छा आहेत. श्री. कारमवार, पाटवार, पुल्लकवार व गड्डुवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांशी मी सहमत आहे. रोजगार देत असताना | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना व महिलांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. ३ ते ६ महिन्यात |

| | | |
|---|---|---|
| | शेजारच्या गावांचा व तालुक्यांचा विचार केला पाहिजे. गावांमध्ये आरोग्य शिबीरांचे आयोजन करून गावकऱ्यांचे आरोग्य जोपासले पाहिजे. सदर शिबीरे ३ ते ६ महिन्यातून एकदा CSR निधीअंतर्गत घेण्यात यावे. आजच्या स्थितीत औद्योगिकीकरणाला विरोध केला तर बेराजगारीचे प्रमाण वाढणार. परिसरातील नागरीकांना रोजगार मिळाला तर त्यांचा उदर्निर्वाहाचा प्रश्न सुटतो. कंपनीला विनंती आहे की त्यांनी गावकऱ्यांना विश्वासात घेऊन काम करावे. चिमूर ते उमरेड महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात आले त्यामुळे या महामार्गावरील अपघातांच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली. त्याचप्रमाणे चंद्रपूर ते मुल या महामार्गाचे चौपदरीकरण करणे गरजेचे आहे जेणेकरून अपघातांची संख्या कमी होईल. | आरोग्य शिबीर घेण्याबाबत विचार करण्यात येईल. |

**८) श्री. गौरव गोपीचंद शामकुळे, अध्यक्ष, शोध विचार वेध बहुउद्देशीय संस्था, ता. मुल, <u>जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चंद्रपूर शहराचे प्रदूषण हे मुल शहराच्या प्रदूषणाच्या तुलनेत फार कमी आहे. तरी देखील येथे येणाऱ्या प्रकल्पांचा मूल शहराबाहेरील लोकांकडून विरोध करण्यात येतो. हे थांबायला हवे. कंपनीने एखादा प्रकल्प एखाद्या ठिकाणी कार्यान्वित करावयाचा की नाही याबाबत प्रकल्पालगत असणाऱ्या स्थानिक लोकांनी ठरावयाचे असते. कारण स्थानिकांना रोजगाराची गरज आहे. येथे सांगण्यात आले की CSR निधीच्या माध्यमातून झाडे लावण्यात येतील. परंतु सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या मे. जी.आर.कृष्णाच्या बाजूला किती झाडे लावली याचा विचार व्हायला हवा कारण वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही. ईएसपी २४ तास कार्यरत असायला हवे परंतु कंपनी ईएसपी कार्यरत ठेवत नाही. राखेचे प्रदूषण रोखले पाहिजे. कंपनीने प्रदूषणाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे तसेच परिसरात दवाखाना राखीव ठेवण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पाच्या एकूण जागेपैकी ३३ टक्के ते ४० टक्के जागेत हरीतपट्टा विकसित करण्यात येईल. प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण व्यवस्था नियमित चालविण्यातय येईल. |

**९) <u>श्री. मनिष रक्षमवार, मुख्य संपादक, खबर महाराष्ट्र न्युज चॅनल, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या परिसरामध्ये उद्योग यायला हवेत व त्यामध्ये स्थानिकांनाच रोजगार देण्यात यावा. बाहेर राज्यातील लोकांना रोजगार देण्याचे टाळावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. स्थानिकांन रोजगार देण्यात येईल. |

१०) **श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी कंपनी प्रशासनाचे अभिनंदन करत आहे. मी पर्यावरणवादी असल्याने फक्त पर्यावरण मुद्दयांवर भाष्य करत आहे. आपल्या पर्यावरण सल्लागाराने जल, हवा, जमिन याचे सर्वेक्षण केलेले आहे. तरी परिसरातील पीकांची सद्यस्थिती, आरोग्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची स्थिती याबाबत सर्वेक्षण करण्यात यावे. त्याचा भविष्यात उपयोग होईल. आपली जी जमिन खनन क्षेत्रात जाणार आहे, तेथे पावसाचे पाणी हे सुमारे 350 कोटी लिटर मिळणार आहे.तरी रेन व्हॉटर हार्व्हेस्टींग प्रकल्पात राबविण्यात यावेत. जरी जिल्ह्याबाहेर हरितपट्टा विकसनास परवानगी मिळालेली असली, तरी प्रकल्प क्षेत्रात शक्य असेल तेथे औषधी वनस्पती व फळझाडे लावण्यात यावीत. त्यातप्रमाणे प्रकल्प परिसरातील गावात वृक्षारोपण व रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडे लावण्यात यावीत. मी स्थानिक युवक-युवतींना कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्याची सूचना करत आहे. त्यामुळे स्थानिक युवक युवती हे रोजगारक्षम होतील. मी सदरहू योजना अंमलबजावणीसाठी समन्वयक समिती गठित करण्याची शिफारस करत आहे. सदरहू खाणीमुळे देशाचे परकीय चलन वाचणार आहे. मी भारत सरकारला आपणसा परवानगी देण्याची विनंती करतो. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

११) **श्री. आनंद घाटे, मरेगांव, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सादरीकरण फक्त दाखवण्यापूरते मर्यादित असते. येथे फक्त रोजगाराला प्राधान्य देण्यात येत आहे. परंतु भविष्यात कंपनीकडून होणाऱ्या प्रदूषणामुळे आपल्या आरोग्यावर काय वाईट परिणाम होईल याचा कोणीच विचार केलेला नाही. तसेच शेतीवर देखील प्रदूषणाचा विपरीत परिणाम होईल. परिसरामध्ये प्रकल्प यायला हवा परंतु प्रदूषणामुळे होणारे दुष्परिणाम टाळण्याकरिता उपाययोजना करावी. एखाद्या कर्मचाऱ्याचा अपघात झाल्यास त्याचे आर्थिक नूकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पातील सर्व कामगारांची नोंद कर्मचारी राज्य विमा निगम मध्ये करण्यात येते. त्यांचे सर्व उपचार कर्मचारी राज्य विमा निगममार्फत करण्यात येते. आपल्या सुचनांची नोंद घेण्यात आली आहे व त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

१२) **श्री. अमित राऊत, पत्रकार, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | पर्यावरण जनसुनावणीमध्ये दिलेले आश्वासनांची पूर्तता करण्यात येत नाही. स्थानिकांना मुबलक प्रमाणात रोजगार मिळत नाही. तसेच सदर जनसुनावणीबाबत पत्रकांराना सामाजिक माध्यमांमार्फत निमंत्रण दिलेले नाहीत. स्थानिकांना विश्वासात घेऊन कंपनीने काम करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

१३) **श्री. एच. चंद्रशेखर, पर्यावरणवादी, हैदराबाद:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने हरितपट्टा विकसित करावा, CSR निधीचा परिसरातील गावांच्या विकासासाठी खर्च करावा. १०० टक्के स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. कौशल्य विकास केंद्र उभारावे. कंपनीने औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व पावसाच्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन करावे. तसेच कर्मचाऱ्यांना सुरक्षा किट देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पावसाच्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन केले जाईल. आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

१४) **श्री. संदीप कारमवार, रा. आकापूर, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्प प्रवर्तकांनी शेजारच्या सर्व ग्रामपंचायतींच्या सहकाऱ्याने शेजारच्या गावांमध्ये वृक्षारोपणाचे कार्य हाती घ्यावे. तसेच आरोग्याबाबत वर्षातून किमान ४ वेळा आरोग्य शिबीर घ्यावे व त्यामध्ये सर्व प्रकारच्या रोगांची तपासणी करण्यात यावी व त्याचे निदान करण्यात यावे. कर्मचाऱ्यांना सुरक्षा किट देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे व त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल. |

१५) **श्री. प्रशांत गड्डवार, मूल, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | म.औ.वि. मंडळ परिसरातील रस्त्यांवर पथदिवे नाहीत तसेच कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नाही. माझी कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन द्यावे जेणेकरून त्यांचा उदर्निर्वाह होऊ शकणार. स्थानिकांचा प्रकल्पाला विरोध नसून प्रदूषणाला विरोध आहे. कंपनीने दवाखाना उपलब्ध करून द्यावा. स्थानिकांना रोजगार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | मिळणे हीच आमची मागणी आहे. | |
|---|---|---|

१६) <u>श्रीमती सीमा किशोर लाडवे, मरेगांव, ता. मूल, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने ग्रामपंचायतीचा कर अदा केलेला नाही. महिलांना रोजगार देत नाहीत. स्थानिकांना रोजगार देत नाहीत. बाहेरच्या व्यक्तिंना रोजगार देण्यात येतो. गावातील नागरीकांना कोणत्याही सोई सुविधा देण्यात येत नाहीत. पाण्याची सोय नाही. कंपन्यांमुळे प्रदूषण झाले आहे. कंपनीने गावाचा विकास केला पाहिजे. कंपनीने मरेगांवकडे दुर्लक्ष केले आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सूचनांची नोंद घेण्यात आली आहे व योग्य ती कारवाई करण्यात येईल. म.औ.वि.मंडळ सोबत चर्चा करून पाणी पूरविण्याचे प्रयत्न करण्यात येईल. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. ऑनलाईन वर सुद्धा कुणीही नागरीक उपस्थित नव्हते.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ८४ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भादुले)**
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(संजय पवार)**
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर